**मुख्य अभियंता -स्थापत्य (गट-अ) संवर्गात तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नत्या/ नेमणूका/बदल्या**

ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 723
Date: 23.03.2023

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२३/ ०८१५/प्र.७**
**दिनांक :-** 17 MAR 2023

**संदर्भ -** कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्र.पदस्था-२०२१/प्र.क्र.१२५/गृनिभू, दि.०९.०३.२०२३

## आ दे श

कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांच्या संदर्भाधिन आदेशान्वये दिलेल्या मान्यतेनुसार प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन, **(उपमुख्य अभियंता-स्थापत्य) (गट-अ)** या संवर्गातील खालील नमूद अभियंत्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून **मुख्य अभियंता स्थापत्य (गट-अ)** या संवर्गात एस-२९, रु.१३११००-२१६६०० या वेतनस्तरामध्ये तदर्थ, पूर्णपणे तात्पुरत्या आणि स्थानापन्न स्वरुपात कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | सध्याची पदस्थापना मंडळ | मुख्य अभियंता संवर्गात पदोन्नतीनंतर पदस्थापना व कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शिवकुमार आडे | उपमुख्य अभियंता/ परिमंडळ-३/ मुं.इ.दु.व पु. मंडळ | मुख्य अभियता -३ प्राधिकरण | रिक्त पदी |

२/- सदरहू, अधिकाऱ्यांची तात्पुरत्या तदर्थ पध्दतीनुसार पदोन्नतीने केलेली नेमणूक अभियांत्रिकी सेवा संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमाच्या अधीन राहून ज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या तदर्थ व स्थानापन्न स्वरुपाची असल्याने त्यांचा या संवर्गातील कायम पदावर कोणताही हक्क/धारणाधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

३/- प्रशासकिय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

४/- संबंधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

५/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक ]/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

६/- संबंधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

७/- संबंधित अधिकाऱ्यांनी कमीत कमी पदग्रहण अवधी घेऊन नव्या पदाचा पदभार स्विकारावा. संबंधित अधिकारी पदोन्नतीने पदस्थापनेच्या पदावर कार्यमुक्त आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या विहित मुदतीत रुजू न झाल्यास त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (Dies Non) म्हणून गणला जाईल. तसेच त्यांचे लक्ष महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ कडे वेधण्यात येत आहे. सदर नियमातील तरतूदी लक्षात घेता, त्यांना पदस्थापनेत बदल करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदन सादर केल्यास शिस्तभंगाच्या कारवाईसाठी पात्र ठरतील. त्यांच्या सक्षम अधिका-यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

८/- पदोन्नत पदधारक हे पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी ३० दिवसाच्या आत रुजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यात येईल. तसेच याबाबत शासन निर्णय दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल व पदोन्नतीसाठी पुढील २ वर्षे त्यांचे नावाचा विचार करण्यात येणार नाही. तिसऱ्या वर्षी त्यांचे नाव विभागीय पदोन्नती समितीसमक्ष सादर करण्यात येईल.

९/- उपरोक्त अधिकाऱ्याची कनिष्ठ संवर्गातील सेवाज्येष्ठता वरीष्ठ संवर्गात अबाधित राहील.

१०/- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानूसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनूसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनूसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पूर्तता होत नसल्याचे आढळून आल्यास पदोन्नती आदेश रद्द करण्यात येतील.

**११/- उपरोक्त अधिकाऱ्यांनी दि.३१/३/२०२२ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. तसेच आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

(राजकुमार सागर)
**सचिव / प्राधिकरण**

**प्रति,**
**(श्री. शिवकुमार आडे, उपमुख्य अभियंता/ परिमंडळ-३/ मुं.इ.दु.व पु. मंडळ)**
**( मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु. मंडळ यांच्यामार्फत)**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा.
२) मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ
३) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
४) वित्त नियंत्रक/प्रा.
५) विधी सल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८) मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं., कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ
९) चौकशी अधिकारी/प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी/प्रा.
११) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२) मुख्य माहिती अधिकारी /प्रा (संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता)
१३) निवासी लेखा परीक्षाअधिकारी/प्रा.
१४) पी.डी.सी. पुणे मंडळ

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**प्रत:**

१. मुख्य लेखाधिकारी, मुं.इ.दु.व पु.मंडळ
२. लेखाधिकारी, प्रा
३. प्रशासकीय अधिकारी, प्रा./ मुं.इ.दु.व पु.मंडळ

**प्रत माहितीसाठी:-**
अध्यक्ष,महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रधान कार्यवाह,मागासवर्गीय कर्मचारी संघटना
अध्यक्ष,ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा,मुंबई.

**प्रत**:प्रशासन-६,९,१०,११,१२,१३,/प्रा.